२४१

**तीन महिन्यांच्या नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्यावर शासकीय कर्मचाऱ्याची सेवानिवृत्ती आणि स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर अर्हताकारी सेवेत भर**

महाराष्ट्र शासन

**वित्त विभाग**

शासन निर्णय, क्रमांक पीईएन. १०८३/सीआर-१२९६/८३/एसईआर-४

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑक्टोबर १९८४

**शासन निर्णय**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १० च्या पोट-नियम (४) अन्वये किंवा नियम ६५ मधील पोट-नियम (१) अन्वये, शासकीय कर्मचाऱ्याच्या वयाची ५०/५५ वर्षे पूर्ण झाल्यावर किंवा यथास्थिति त्याची ३० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यावर समुचित प्राधिकारी हा, कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन कोणत्याही वेळी त्यास लोकहितास्तव सेवानिवृत्त करू शकतो. तसेच उपरोक्त नियमांमधील नियम १० च्या पोट-नियम (५) अन्वये किंवा नियम ६५ मधील पोट-नियम (१) अन्वये, शासकीय कर्मचाऱ्याला, त्याच्या वयाची ५०/५५ वर्षे पूर्ण झाल्यावर किंवा यथास्थिति ३० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यावर समुचित प्राधिकाऱ्यास कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन कोणत्याही वेळी सेवानिवृत्त होता येते. या दोन्ही बाबतींत, नोटिशीची तीन महिन्यांची मुदत संपण्याच्या तारखेच्या लगतनंतरची तारीख किंवा निवृत्ति-पूर्व रजा समाप्तीची तारीख यांपैकी जी नंतरची असेल, ती सेवानिवृत्तीची तारीख असते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ अन्वये, शासकीय कर्मचारी, त्याची २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यावर, कोणत्याही वेळी, नियुक्ति प्राधिकाऱ्यास कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवानिवृत्त होऊ शकतो. त्याच्या सेवानिवृत्तीची तारीख, नोटिशीची तीन महिन्यांची मुदत संपण्याच्या तारखेच्या लगतनंतरची तारीख असते. सध्या वर निर्दिष्ट केलेल्या नियमान्वये सेवानिवृत्तीच्या तारखांमध्ये एकरूपता नाही. अशा प्रकरणात सेवानिवृत्तीच्या तारखांमध्ये एकरूपता आणण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असा निदेश देत आहे की, ज्या शासकीय कर्मचाऱ्याला त्याच्या वयाची ५०/५५ वर्षे पूर्ण झाल्यावर किंवा त्याने ३० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यावर सेवानिवृत्त केले जाते, किंवा अशाच परिस्थितीत जो शासकीय कर्मचारी समुचित प्राधिकाऱ्यास तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन स्वतःहून सेवानिवृत्त होतो असा कर्मचारी, तीन महिन्यांच्या नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेनंतरच्या दिवशी शासकीय सेवेतून निवृत्त होईल.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ च्या पोट-नियम (३) अन्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या इच्छित सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत होणाऱ्या अर्हताकारी सेवेमध्ये ५ वर्षांपर्यंत वाढ दिली जाते. मात्र, अशा वाढीनंतर होणारी एकूण अर्हताकारी सेवा कोणत्याही परिस्थितीत ३० वर्षांहून अधिक होता कामा नये. त्याचप्रमाणे अशी वाढीव अर्हताकारी सेवा, उपरोक्त नियमामधील नियम १० च्या पोट-नियम (५) अन्वय स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी विहित

केलेल्या किमान वयोमर्यादेस तो स्वेच्छेने सेवानिवृत्त झाला असता तर, त्याची जेवढी अर्हताकारी सेवा झाली असती त्या सेवेपेक्षा अधिक होता कामा नये. शासन असा निदेश देत आहे की, शासकीय कर्मचाऱ्याने २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यावर कोणत्याही वेळी स्वेच्छेने सेवानिवृत्ती स्वीकारल्यास त्याच्या इच्छित सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंतची सेवा **पाच वर्षांपर्यंत** अशा रीतीने वाढविण्यात यावी की, त्याची एकूण अर्हताकारी सेवा, कोणत्याही परिस्थितीत ३३ वर्षांहून अधिक होता कामा नये व अशा वाढीमुळे त्याच्या नियतवयमानाची तारीख पुढे जाता कामा नये.

४. शासन असाही निदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १० चा पोट-नियम (५) किंवा नियम ६५ चा पोट-नियम (१) या अन्वये सेवानिवृत्त होऊ इच्छिणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यालाही परिच्छेद ३ मधील निर्णय लागू करण्यात यावा. याप्रमाणे या नियमानुसार स्वेच्छेने सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, इच्छित सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंतची त्याची अर्हताकारी सेवा ५ वर्षांपर्यंत अशा रीतीने वाढविण्यात यावी की, त्याची एकूण अर्हताकारी सेवा, कोणत्याही परिस्थितीत ३३ वर्षांहून अधिक होता कामा नये व अशा वाढीमुळे त्याच्या नियतवयमानाची तारीख पुढे जाता कामा नये.

वर उल्लेखिलेल्या अर्हताकारी सेवेतील ५ वर्षांपर्यंतच्या वाढीचा फायदा, उपरोक्त नियमामधील नियम १० चा पोट-नियम (४) किंवा नियम ६५ चा पोट-नियम (१) या अन्वये शासनाने लोकहितास्तव, मुदतीच्या पूर्वी सेवानिवृत्त केलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला मिळणार नाही.

५. परिच्छेद २ मधील निर्णय लक्षात घेऊन शासन असा निदेश देत आहे की, जो शासकीय कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम १० किंवा नियम ६५ अन्वये सेवानिवृत्त होतो किंवा ज्याला सेवानिवृत्त करण्यात येते, किंवा नियम ६६ अन्वये जो सेवानिवृत्त होतो अशा कर्मचाऱ्याला, रजा मंजूर करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, **स्वाधिकारे** त्या कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली १८० दिवसांच्या कमाल मर्यादेपर्यंतची अर्जित रजा, तसेच त्याच्या खाती जमा असलेली अर्धवेतनी रजा यांच्या बाबतीत, रजा वेतनाचे रोख सममूल्य मंजूर करील. मात्र, तो कर्मचारी ज्या तारखेस सेवानिवृत्त होईल किंवा त्याला सेवानिवृत्त केले जाईल ती तारीख आणि नियतवयमान झाल्यावर ज्या तारखेस तो नेहमीप्रमाणे सेवानिवृत्त झाला असता ती तारीख, यांमधील कालावधीपेक्षा त्याच्या रजेचा कालावधी अधिक होता कामा नये. रोख सममूल्य हे, अर्जित रजा आणि/किंवा अर्धवेतनी रजा यांच्या बाबतीत अनुज्ञेय असलेल्या रजा वेतनाइतके असेल आणि शासकीय कर्मचारी ज्या तारखेस सेवानिवृत्त होईल किंवा त्याला सेवानिवृत्त केले जाईल त्या तारखेस अंमलात असलेल्या दराने, पहिल्या १८० दिवसांकरिता त्या रजा वेतनावर अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता मिळेल. रोख सममूल्य प्रदेय असलेल्या अर्धवेतनी रजेच्या कालावधीबद्दल दिल्या जाणाऱ्या रजा वेतनातून, निवृत्तिवेतन आणि इतर सेवानिवृत्ति लाभांचे निवृत्तिवेतन सममूल्य व निवृत्तिवेतनावर अनुज्ञेय असलेल्या वाढीची रक्कम, **कमी** करण्यात येईल. अशा प्रकारे, परिगणित केलेली रक्कम एकाच वेळी एका ठोक रकमेत चुकती केली जाईल. त्यामध्ये घरभाडे भत्ता किंवा स्थानिक पूरक भत्ता दिला जाणार नाही. अर्धवेतनी रजेचे रजा वेतन हे, निवृत्तिवेतन व इतर निवृत्तिविषयक लाभांच्या रकमेहून कमी असेल तर अर्धवेतनी रजेचे रोख सममूल्य दिले जाणार नाही.

ज्या शासकीय कर्मचाऱ्यास शासनाने नोटिशीऐवजी वेतन व भत्ते देऊन सेवानिवृत्त केले असेल अशा कर्मचाऱ्यास, ज्या कालावधीबद्दल वेतन व भत्ते देण्यात आले त्या कालावधीच्या आंत, रजेसाठी अर्ज करता येईल आणि त्याला रजा मंजूर केली असेल तेव्हा, नोटिशीऐवजी ज्या कालावधीबद्दल त्याला वेतन व भत्ते देण्यात आले तो कालावधी वगळून उरलेल्या कालावधीबद्दलच केवळ त्याला रजा वेतन मंजूर केले जाईल.

243 -3-

अर्जित रजा व अर्धवेतनी रजा यांबद्दल द्यावयाचे रजा वेतन खाली दर्शविल्याप्रमाणे परिगणित करण्यात येईल :—

**(एक) अर्जित रजा—**

अर्जित रजेबद्दल रोख रक्कम = (वेतन + सेवानिवृत्तीच्या तारखेस त्यावर अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता.) / ३० × १८० दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन अर्जित रजेचे दिवस.

**(दोन) अर्धवेतनी रजा—-**

अर्धवेतनी रजेबद्दल रोख रक्कम = (अर्धवेतनी रजा वेतन + अनुज्ञेय असल्यास त्यावरील महागाई भत्ता **वजा** निवृत्तिवेतन, आणि इतर सेवानिवृत्ति लाभांचे निवृत्तिवेतन सममूल्य आणि अर्धवेतनी रजा वेतनावर महागाई भत्ता अनुज्ञेय असल्यास, निवृत्तिवेतनावरील वाढ.) / ३० × नियमांत विहित केलेल्या मर्यादांच्या अधीन सेवानिवृत्तीच्या तारखेस मंजूर केलेल्या अर्धवेतनी रजेचे दिवस.

६. हे आदेश **२५ मे १९८४** पासून अंमलात येतील. ज्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत सेवानिवृत्तीच्या नोटिशीची मुदत २५ मे १९८४ रोजी किंवा त्यानंतर संपत असेल, अशा कर्मचाऱ्याला या आदेशाचे लाभ देण्यात यावेत. जो शासकीय कर्मचारी, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम १० किंवा नियम ६५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सेवानिवृत्त होतो किंवा ज्याला सेवानिवृत्त केले जाते आणि ज्याच्या नोटिशीची मुदत २५ मे १९८४ रोजी किंवा त्यानंतर संपते आणि ज्याला आधीच निवृत्तिपूर्व रजा मंजूर केली आहे अशा कर्मचाऱ्याला, एकतर नोटिशीच्या समाप्तीच्या तारखेस सेवानिवृत्त होऊन या आदेशान्वये अनुज्ञेय असतील तेवढे लाभ घेण्याचा किंवा रजेवरच राहण्याचा विकल्प देण्यात यावा. रजेवरच राहण्याचा विकल्प देणारा कर्मचारी रजा समाप्तीच्या तारखेनंतरच्या तारखेस सेवानिवृत्त होईल.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील या संबंधीच्या विद्यमान तरतुदींमध्ये या शासन निर्णयाच्या तरतुदीपुरती सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमांत यथावकाश रीतसर सुधारणा करण्यात येईल.

८. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यं. दे. पानसे,**
शासनाचे सहसचिव.